# ‘इतिहासापासून शिकून आव्हाने स्वीकारा’

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

इतिहास शिकला पाहिजे. या इतिहासापासून धडे घेऊन वर्तमानात जगा. वर्तमानातील आव्हानांना स्वीकारा आणि भविष्याकडे पाहा, असे मार्गदर्शन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी एसएनडीटी येथील विद्यार्थिनींना केले. एसएनडीटी विद्यापीठाच्या ६९व्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते. विद्यापीठाच्या पाटकर दीक्षांत सभागृहात हा समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी ज्येष्ठ साहित्यिका, लेखिका डॉ. अरुणा ढेरे आणि राष्ट्र सेविका समितीच्या प्रमिला मेढे यांना मानद डी. लिट. प्रदान करण्यात आली.

या विद्यार्थिनींशी बोलताना राज्यपालांनी त्यांना स्वतःला पृथ्वीस्वरूप समजा म्हणजे म्हणजे आत्मविश्वास वाढेल, असेही सांगितले. ‘महिलेमध्ये असणारा आत्मविश्वास, धाडस हे तिला नेहमीच पाठबळ देत असते. महिला ही सहनशक्तीचा मोठा खजिना आहे,’ असेही कौतुकोद्गार त्यांनी यावेळी काढले.

यावेळी डी. लिट. पदवी स्वीकारताना कृतज्ञता व्यक्त करत प्रमिला मेढे यांनी



- एस. एन. डी. टी. विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ
- डॉ. अरुणा ढेरे, प्रमिला मेढे यांना मानद डी. लिट. प्रदान

## राज्यपालांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

एसएनडीटी आणि राष्ट्र सेविका समिती यांच्या नात्याच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. तसेच स्त्री-आरोग्य आणि स्त्री-शिक्षण हे विषय दुर्लक्षित राहिलेले आहेत त्यामुळे समस्या निर्माण होत आहेत, असे मत त्यांनी व्यक्त केले.

डॉ. अरुणा ढेरे यांनीही डी. लिट. च्या निमित्ताने आपले मनोगत व्यक्त करताना पूर्वसंचिताला नाकारू नये, असे आवाहन केले. ‘नवज्ञान, विज्ञान ही आधुनिक जगाची ओळख आहे. यामध्ये पूर्वसंचिताला नाकारण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, काळाचा पट केवळ वर्तमानाचा नाही,’ असे सांगत लेखनातून पूर्वसंचित जपण्यासाठीही धडपड करत असल्याची भावना डॉ. ढेरे यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून सामाजिक उद्योजक आणि उद्यमिता विद्यापीठाच्या संचालिका डॉ. नंदिता पाठक उपस्थित होत्या. त्यांनीही, ‘सतत शिकत राहा, समाजाला काही



देण्यासाठी शिक्षण सुरू ठेवा,’ असे विद्यार्थिनींना सांगितले. समारंभाच्या सुरुवातीला विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. शशिकला वंजारी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी विद्यापीठाच्या कार्यांचा आढावाही त्यांनी घेतला. विद्यापीठाने १६ लाख ६० हजारांचा निधी विद्यार्थिनींच्या मदतीसाठी उभारल्याचे त्या म्हणाल्या. तसेच ७ लाख ७२ हजारांचे अनुदानही मिळाल्याची माहिती, त्यांनी यावेळी दिली.

या दीक्षांत समारंभात चार विद्याशाखांतर्गत १३ हजार ९०४ पदवीधर विद्यार्थिनींना पदवी आणि पदविका प्रदान करण्यात आली. यापैकी १२० विद्यार्थिनींना विविध पारितोषिके मिळाली असून यात ६२ सुवर्णपदके आणि ८६ बक्षिसे होती.